
# समाजसुधारक


















# सराव प्रश्न:

1)महर्षी कर्वे यांच्या विषयी खालील विधाने अभ्यासून चुकीची नसलेली विधाने ओळखा

अ) रावबहादूर गोखले यांनी महिला विद्यापीठासाठी सहकार्य केले

ब)मुंबई विद्यापीठाने डि.लीट या पदवीने कर्वे यांचा सन्मान केला

क)कर्वे यांनी 1936 या वर्षी ग्राम प्राथमिक शिक्षण मंडळाची स्थापना केली

ड) कर्वेंच्या मते स्त्री शिक्षणासाठी केलेले विचार व उच्चार हीच परमेश्वराची प्रार्थना होय

पर्याय:1)ब, क,ड      2)अ,क      3)अ,ब      4)क,ड

3)चुकीची जोडी ओळखा

1)एल्फिन्स्टन महाविद्यालयात विज्ञानाचे शिक्षक - भाऊ दाजी लाड

2) 1891 पासून  एल्फिन्स्टन महाविद्यालयात गणिताचे प्रा.- महर्षी कर्वे

3) अक्कलकोटच्या युवराजांचे शिक्षक बाळशास्त्री जांभेकर

4) जावरा संस्थानच्या नवाबाचे शिक्षक- तरखडकर

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर
# (1891-1956)



- जन्म: 14 एप्रिल, 1891, मध्य प्रदेशातील इंदूरजवळील महू येथे.
- मूळ गाव आंबडवे (जि. रत्नागिरी)

- मूळ नाव : भीमराव रामजी सकपाळ ऊर्फ आंबावडेकर.
- आईचे नाव : भीमाबाई
- डॉ. बाबासाहेब हे त्यांच्या आई-वडिलांचे 14 वे व शेवटचे अपत्य होते.

- शिक्षण : प्राथमिक शिक्षणासाठी काही काळ दापोली व त्यानंतर साताऱ्यातील ॲग्रीकल्चर स्कूल (एलिमेंटरी स्कूल/प्रतापसिंह स्कूल) मध्ये प्रवेश.
- या शाळेतील कृष्णाजी केशव आंबेडकर या प्रेमळ गुरुंनी बाबासाहेबांना आपले 'आंबेडकर' हे आडनाव स्वीकारण्यास सांगितले.
-

- 1905 : रमाबाई यांच्याशी विवाह.
- 1907 : मुंबईच्या एल्फिन्सटन हायस्कूलमधून मॅट्रिक परिक्षा उत्तीर्ण. या शाळेतील केळूसकर या शिक्षकांच्या प्रयत्नाने बाबासाहेबांना बडोदाधिपती सयाजीराव गायकवाड यांची दरमहा रु. 25 ची शिष्यवृत्ती मिळाली व एल्फिन्सटन कॉलेजमध्ये त्यांनी प्रवेश घेतला.

- 1912 : अर्थशास्त्र व राज्यशास्त्र हे विषय घेऊन बाबासाहेब एल्फिन्सटन कॉलेजमधून बी. ए. ची परीक्षा उत्तीर्ण.
- 1993 : बडोदा संस्थानात काही काळ नोकरी.
- महाराज सयाजीराव गायकवाड यांनी दिलेल्या दरमहा रु. २५ च्या शिष्यवृत्तीच्या आधारे जुलै 1913ते जुलै 1916 या काळात बाबासाहेबांनी उच्च शिक्षणासाठी अमेरिकेतील कोलंबिया विद्यापीठात प्रवेश घेतला.

- 1915 : Administration & Finance of East India Company हा प्रबंध कोलंबिया विद्यापीठात सादर केला व एम. ए. ची पदवी संपादन केली.
- 1916 : कोलंबिया विद्यापीठाची पीएच. डी. मिळविण्यासाठी बाबासाहेबांनी 'National Dividend of India, a Historical and Analitycal study (भारताच्या राष्ट्रीय नफ्याचा वाटा : एक ऐतिहासिक पृथक्करणात्यक परिशीलन) हा प्रबंध लिहिला.

- 1917 साली वरील प्रबंध 'ब्रिटिश भारतातील प्रांतिक अर्थव्यवस्थेची उत्क्रांती' (Evolution of Provincial Finance in British India) या नावाने प्रसिद्ध झाल्यावर त्यांना कोलंबिया विद्यापीठाची Ph.D. ही पदवी मिळाली.
- ऑक्टोबर 1916 : लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी प्रवेश घेतला. दरम्यान शिष्यवृत्तीची मुदत संपल्याने वर्षभरातच त्यांना भारतात परतावे लागले.

- 1917 : मुंबईत 'वर्स कॉलेज' या खाजगी व्यापारी शिक्षण संस्थेत काही काळ अर्थशास्त्र, बैंकिंग व कायदा या विषयांचे अध्यापन,
- नोव्हेंबर 1918 : मुंबईच्या सिडनेहॅम कॉमर्स कॉलेजमध्ये प्राध्यापक म्हणून नियुक्ती. सिडनेहॅम कॉलेजमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर अर्थशास्त्र हा विषय शिकवत असत.

- 1920या वर्षीच राजर्षी शाहूंच्या आर्थिक सहाय्यामुळे बाबासाहेब पुढील अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठी इंग्लंडला रवाना झाले.
- 1921- लंडन विद्यापीठाची M.Sc. पदवी प्राप्त.
- 1923 : लंडन विद्यापीठाची D.Sc. ही पदवी. विषय 'द प्रॉब्लेम ऑफ रूपी' (भारतीय रुपयाचा प्रश्न)

- याच दरम्यान बाबासाहेबांनी काही काळ जर्मनीतील बॉन विद्यापीठात कायद्याचा अभ्यास केला.
- 1923 : बॅरिस्टरची परीक्षा उत्तीर्ण.
- 1924 भारतात परतल्यावर काही काळ मुंबई उच्च न्यायालयात वकिली,
- 1928 : मुंबईतील शासकीय विधी महाविद्यालयात अध्यापनाचे कार्य.

- 1935 - 38: या काळात मुंबईतील शासकीय विधी महाविद्यालयाचे प्राचार्य.
- 1935 : बाबासाहेबांच्या प्रथम पत्नी रमाबाई (रामीबाई) यांचे निधन झाले.
- 1948 : डॉ. शारदा कबीर यांच्याशी विवाह. लग्नानंतर सविता आंबेडकर असे नाव.
- 1946: मुंबई येथे पीपल्स एज्युकेशन सोसायटीची स्थापना.

- बाबासाहेब आंबेडकर यांच्या शैक्षणिक सुधारणा :
- 1928 : डिप्रेस्ड क्लासेस एज्युकेशन सोसायटीची स्थापना.
- या संस्थेमार्फत मुंबई येथे सिद्धार्थ कॉलेज (1946) तर औरंगाबाद येथे मिलिंद कॉलेजची (1950) स्थापना केली.
- डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची राजकीय कारकीर्द मुंबई प्रांताच्या कायदेमंडळाचे सदस्य म्हणून नियुक्ती (1926-1936)

- 1930 ते 1932: लंडन येथील तिन्ही गोलमेज परिषदांना अस्पृश्य बांधवांचे प्रतिनिधी म्हणून बाबासाहेब उपस्थित होते.
- बाबासाहेबांनी गोलमेज परिषदेत दलित बांधवांना प्रोटेस्टंट हिंदू किंवा नॉन कनफर्मिस्ट हिंदूंचा दर्जा मिळावा अशी मागणी केली.
- 1942 -1946: या काळात गव्हर्नर जनरलच्या कार्यकारी मंडळावर मजुरमंत्री म्हणून नियुक्ती.

- डॉ. बाबासाहेब आंबेडकर बंगाल प्रांताच्या विधीमंडळातून घटना समितीवर निवडून आले.
- 29 ऑगस्ट 1947: संविधान सभेच्या मसुदा समितीचे अध्यक्ष म्हणून निवड.
- 1947 : स्वातंत्र्यप्राप्तीनंतर पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या मंत्रिमंडळात कायदामंत्री.

- 1948 : हिंदू कोड बिलाची निर्मिती. (हिंदू कोड बिल हे अविभक्त कुटुंब पद्धती विरुद्ध होते. या बिलानुसार स्त्रिया व समाजातील इतर घटकांना समान हक्क मिळणार होते.)
- 1951 : हिंदू कोड बिलास विरोध झाल्याने बाबासाहेबांनी मंत्रिपदाचा त्याग केला.

- 1952 च्या पहिल्या सार्वत्रिक निवडणुकीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या शेड्यूल्ड कास्ट फेडरेशन या पक्षाने लोकसभेच्या ३४ जागा लढविल्या. त्यापैकी २ सदस्य निवडून आले. तर याचवेळी विविध राज्यांतील विधानसभा निवडणुकांमध्ये 215जागा लढविल्या, त्यापैकी 12 सदस्य निवडून आले.

- 1952 च्या पहिल्या लोकसभा निवडणुकीत डॉ. बाबासाहेब उत्तर-मध्य मुंबई या राखीव मतदारसंघातून पराभूत झाले होते.
- बाबासाहेबांचे एकेकाळचे सहकारी व काँग्रेस नेते नारायण सादोबा काजरोळकर यांनी त्यांना पराभूत केले.
- मार्च 1952 मध्ये डॉ. बाबासाहेब राज्यसभेवर निवडून गेले.

- डॉ. बाबासाहेबांनी साऊथवरो समितीसमोर साक्ष मांडताना प्रांतिक कायदेमंडळात अस्पृश्य बांधवांना स्वतंत्र प्रतिनिधित्व देण्यासंबंधी शिफारस केली.

- कायदेमंडळात कामगार खात्याचे मंत्री असताना बाबासाहेबांनी 1942 ते 1946 या कालावधीसाठी पुनर्बांधणी व पुनर्वसन योजना राबविली.

- 1936:  स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापना केली.
- या पक्षाचे चिन्ह माणूस हे होते.
- 1942 यावर्षी अखिल भारतीय शेड्युल्ड कास्ट फेडरेशन मध्ये याचे रूपांतर झाले.

- शेडूल कास्ट फेडरेशनच्या स्थापनेमागे आप्पा दुराई यांची प्रेरणा होती
- शेड्युल कास्ट फेडरेशनचे पुढे रूपांतर रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया या पक्षात झाले
-
-

- डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्थापन केलेल्या संस्था
- 20 जुलै 1924 बहिष्कृत हितकारिणी सभा मुंबई येथे या सभेची स्थापना.
- डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे या सभेच्या कार्यकारी मंडळाचे अध्यक्ष, तर सीताराम शिवतरकर हे सचिव होते.

- उद्देश : अस्पृश्य बांधवांना शिक्षण देऊन त्यांची आर्थिक स्थिती सुधारणे, मानवी हक्कांचे संरक्षण करणे.
- बहिकृष्त हितकारिणी सभेचे ब्रीदवाक्य 'शिका, चेतवा व संघटीत व्हा'.

- 1927 समाज समता संघाची स्थापना.
- 1928 : या संघातर्फे समता, जनता व प्रबुद्ध भारत ही पत्रे सुरू केली.
- 1955 : बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडिया (भारतीय बौद्ध महासभा) ची स्थापना.

- डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केलेले महत्त्वाचे सत्याग्रह :
- 20 मार्च 1927 : बाबासाहेबांनी आपल्या अनुयायांसह महाड (जि. रायगड) येथे चवदार तळे सत्याग्रह केला.
- 25 डिसेंबर 1927: महाड येथील सत्याग्रह परिषदेत अस्पृश्यतेचे समर्थन करणाऱ्या 'मनुस्मृती' या धर्मग्रंथाचे दहन. या परिषदेचे स्वागताध्यक्ष होते दिपू संभाजी गायकवाड.

- 2 मार्च 1930 : नाशिक येथील काळाराम मंदिर सत्याग्रह. याचे नेतृत्व कर्मवीर दादासाहेब गायकवाड यांनी केले.
- डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केलेली हिंदू मंदिर प्रवेशाची चळवळ ही अस्पृश्य बांधवांच्या सामाजिक गुलामगिरीची बंधने तोडण्यासाठी केलेली चळवळ होती.

- मंदिर प्रवेश चळवळीमुळे १९३५ मध्ये काळाराम मंदिर अस्पृश्य बांधवांना खुले झाले. त्यानंतर एलिचपूर येथील दत्तमंदिर, अमरावतीचे अंबेचे मंदीर, सोलापूरचे सिद्धेश्वर मंदिर इ. मंदिरांच्या सत्याग्रहाच्या चळवळी पुढे आल्या.
- 1933 : हिंदू धार्मिक ग्रंथाच्या पारायणासाठी मुखेड येथे सत्याग्रह.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी शेतकऱ्यांसाठी केलेले कार्य :

- 14  एप्रिल 1929 : चिपळूण येथील शेतकरी परिषदेचे अध्यक्षपद बाबासाहेबांनी भूषविले.
-  1938: बाबासाहेबांनी 'शेतीचे राष्ट्रीयीकरण' ही संकल्पना मांडली.
-  बाबासाहेबांनी पाण्याच्या नियोजनासाठी 'दामोदर खोरे परियोजना' ही संकल्पना मांडली.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे धर्मांतर :

- 13 ऑक्टोबर 1935 : येवला (जि. नाशिक) येथे प्रतिज्ञा: 'हिंदू म्हणून जन्माला आलो तरी मी हिंदू म्हणून मरणार नाही.
- 14 ऑक्टोबर 1956 : नागपूर येथे डॉ. आंबेडकरांनी आपल्या हजारो अनुयायांसह बौद्ध धर्माची दीक्षा घेतली. (नागपूरला दीक्षाभूमी असे संबोधले जाते.)
- 14 ऑक्टोबर हा धम्मचक्र प्रवर्तन दिन म्हणून साजरा केला जातो.
- ब्रह्मदेशचे (म्यानमार) चंद्रमणी महास्थवीर यांनी आंबेडकरांना बौद्ध धर्माची दीक्षा दिली.

- **ग्रंथसंपदा :**

- व्हू वेअर द शुद्राज ? (शुद्र कोण होते?)

- Federation Versus Freedom

- अनटचेबल्स ॲण्ड इंडियन कन्स्टिट्यूशन

- ॲनिहिलेशन ऑफ कास्टस् (जातीव्यवस्थेचे निर्मूलन)

- द अनटचेबल्स
- स्मॉल होल्डिंग्ज इन इंडिया अ‍ॅण्ड देअर रिमेडिज् (१९१८)
- अ‍ॅडमिनिस्ट्रेशन अ‍ॅण्ड फायनान्स ऑफ द इस्ट इंडिया कंपनी
- What Congress & Gandhi have done to the Untouchables

- थॉटस् ऑन पाकिस्तान
- द प्रॉब्लेम ऑफ रूपी
- बुद्ध अँड हिज धम्म
- स्टेट अँण्ड मायनॉरिटिज्
- द अनटचेबल्स

- रिडल्स इन हिंदूइजम
- रानडे, गांधी आणि जीना
- कास्टस् इन इंडिया
- थॉटस् ऑन लिंग्विस्टिक स्टेटस्

- 'बुद्ध अँड हिज धम्म' हा डॉ. बाबासाहेब यांचा शेवटचा ग्रंथ मृत्यूनंतर प्रकाशित झाला.
- डॉ. बाबासाहेबांचे आत्मचरित्र : Waiting For A Visa

# पत्रकारिता :

- मूकनायक (1920), बहिष्कृत भारत (1927), जनता (1930), समता, प्रबुद्ध भारत (1956)
- मूकनायक : 31 जानेवारी 1920रोजी राजर्षी शाहू महाराज यांच्या सहाय्यामुळे बाबासाहेबांनी हे पाक्षिक सुरू केले.

- मूकनायकचे पहिले संपादक श्री. पांडुरंग नंदराम भटकर. दुसरे संपादक ज्ञानदेव घोलप
- राजर्षी शाहू महाराज यांनी 'मूकनायक'साठी रु. 2500 ची आर्थिक मदत केली.
- बहिष्कृत भारत : 3 एप्रिल 1927रोजी बाबासाहेबांनी हे पाक्षिक सुरू केले.
- 15 नोव्हेंबर 1929 रोजी 'बहिष्कृत भारत' बंद पडले.

- बहिष्कृत भारत पाक्षिकाच्या शिर्षभागी संत ज्ञानेश्वरांची वचने होती.
- 'जनता' 24 नोव्हेंबर 1930 रोजी प्रकाशित.
- 4 फेब्रुवारी 1956 रोजी 'जनता'चे नामकरण 'प्रबुद्ध भारत' असे करण्यात आले.

- बाबासाहेबांचे प्रसिद्ध अग्रलेख पुनःश्च हरिओम् (बहिष्कृत भारत) आम्ही शासनकर्ती जमात बनणार (जनता)
- बाबासाहेबांचे मुद्रणालय भारत भूषण प्रिंटिंग प्रेस

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यावर प्रभाव टाकणाऱ्या व्यक्ती :**

- गौतम बुद्ध, संत कबीर, महात्मा फुले, रुसो, थॉमस पेन, अब्राहम लिंकन, नेपोलियन बोनापार्ट, जे. एस. मिल. बाबासाहेबांना अवगत असणाऱ्या भाषा : मराठी, हिंदी, इंग्रजी, पारशी, गुजराती, पाली, संस्कृत, बंगाली, जर्मन, फ्रेंच

- मार्च 1920 च्या माणगाव अस्पृश्य परिषदेचे अध्यक्ष डॉ. बाबासाहेब आंबेडकर.
- 1950 : श्रीलंकेतील कोलंबो,
- 1954: म्यानमारमधील यांगून (रंगून) येथील जागतिक बौद्ध धर्म परिषदांना उपस्थिती
- 1956 : नेपाळमधील काठमांडू येथील चौथ्या जागतिक बौद्ध धर्म परिषदेस उपस्थिती.

- डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची प्रसिद्ध वचने : देशाच्या स्वातंत्र्यासाठी रक्ताचा शेवटचा थेंब असेपर्यंत लढले पाहिजे.
- राजकीय सत्ता ही सामाजिक प्रगतीची गुरूकिल्ली आहे.
- भाकरी पेक्षा इज्जत प्यारी.
- शिका, संघटीत व्हा, संघर्ष करा. (दलित बांधवांना संदेश)
- भिक्षेने गुलामी मिळते, स्वातंत्र्य नाही.

- आम्हाला सामाजिक व धार्मिक गुलामगिरीतून मुक्त करा म्हणजे आम्ही तुमच्या खांद्याला खांदा लावून राजकीय स्वातंत्र्यासाठी प्रयत्न करतो.
- कोणत्याही समाजाच्या प्रगतीचा स्तर त्या समाजातील महिलांनी प्राप्त केलेल्या प्रगतीवरून ठरवितो.
- राजकीय सत्तेच्या मोक्याच्या आणि महत्त्वाच्या जागा काबीज करा आणि शासनकर्ती जमात बना.' (दलित बांधवांना आवाहन)

- महापरिनिर्वाण:  6 डिसेंबर 1956 ,दिल्ली
- 7 डिसेंबर 1956 : मुंबईतील दादर (चैत्यभूमी) येथे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्यावर अंतिम संस्कार पार पडले

# PYQ

**1) डॉ. आंबेडकरांनी नेतृत्व केलेल्या खालील चळवळींचे कालानुक्रमानुसार आयोजन करा :(ASO 2021)**

अ. महाड येथील चवदार तळे आंदोलन   ब. मनुस्मृती दहन

क. पर्वती मंदीर सत्याग्रह   ड. काळाराम मंदीर सत्याग्रह

पर्यायी उत्तरे :

(1) अ, ब, क, ड   (2) ब, क, ड, अ

(3) क, ड, अ, ब   (4) ड, अ, ब, क

**2) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याविषयी कालक्रमानुसार रचना करा. (STI 2021)**

अ. मुंबई येथे पिपल्स एज्युकेशन सोसायटीची स्थापना केली

ब. काळाराम मंदिर प्रवेश सत्याग्रह

क. 'शेड्यूल्ड कास्ट फेडरेशनची' स्थापना

ड. 'बहिष्कृत हितकारिणी सभेची' स्थापना

पर्यायी उत्तरे :

(1) ब, ड, अ, क (2) अ, क, ड, ब

(3) ड, ब, क, अ (4) ड, क, अ, ब

**3)खालीलपैकी अयोग्य विधाने ओळखा: (ASO 2020)**

(a) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 'हरिजन सेवक संघाची' स्थापना केली.

(b) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी छत्रपती शाहू महाराजांनी दिलेल्या देणगीतून 'समता' हे वृत्तपत्र चालविले.

(c) पहिल्या गोलमेज परिषदेत महात्मा गांधी व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यात अस्पृश्यांसाठी स्वतंत्र मतदार संघ देण्याबाबत वाद झाले.

(d) 'महार' मांग इत्यादि लोकांस विद्या शिकविण्यासाठी मंडळी' या संस्थेस दक्षिणा प्राईज फंडातून साह्य मिळाले.

पर्यायी उत्तरे :

(1) (a), (c), (d) विधाने अयोग्य आहेत

(2) (a), (b), (c) विधाने अयोग्य आहेत.

(3) (b), (c), (d) विधाने अयोग्य आहेत

(4) (c), (d) विधाने अयोग्य आहेत.

**4) 'संयुक्त मजूर पक्ष' ची स्थापना कोणी केली ? (ASO 2016)**

(1) मेघाजी लोखंडे (2) श्रीपाद अमृत डांगे

(3) महात्मा फुले (4) डॉ. बाबासाहेब आंबेडकर

**5)डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना कोणत्या विद्यापीठाने पी.एच्.डी. प्रदान केली? (ASO 2012)**

(1) लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स

(2) बोस्टन विद्यापीठ

(3) कोलंबिया विद्यापीठ

(4) केंब्रिज विद्यापीठ

**6)डॉ. आंबेडकरांचे कोणते लिखाण नाही ? (ASO 2012)**

(1) दि प्रॉब्लेम ऑफ रूपी.

(2) रिडल्स इन हिंदुइझम

(3) गांधी अँड दि फायनांशियल थॉटस् ऑन लिंग्युइस्टिक स्टेट

(4) वरील एकही पर्याय बरोबर नाही

**7) "बहिष्कृत हितकारिणी सभा" या संस्थेची स्थापना कोणी केली होती ? (STI 2012)**

(1) वि.रा. शिंदे

(2) राजर्षि शाहु महाराज

(3) डॉ बी. आर. आंबेडकर

(4) महात्मा फुले

**8)डॉ. बाबासाहेब आंबेडकरांबाबत पुढील 3 विधानांचा विचार करा. (PSI 2013)**

(a) दलितांच्या राजकीय हक्कांसाठी त्यांनी सन 1936 मध्ये स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापना केली.

(b) त्यांनी म्हंटले होते "जरी मी जन्माने हिंदू असलो तरी मरताना हिंदू राहणार नाही."

(c) ते त्याच वर्षी निवर्तले ज्या वर्षी त्यांनी बुद्ध धर्म स्वीकारला.

वरील कोणती विधाने बरोबर आहेत ?

(1) (a) आणि (b) (2) (b) आणि (c)

(3) (a) आणि (c ) (4) (a), (b) आणि (c)